**VASANTRAO NAIK MARATHWADA KRISHI VIDYAPEETH**
**PARBHANI – 431 402 (MS) INDIA**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी - ४३१४०२
**कुलसचिव कार्यालय, विद्या विभाग, प्रशासकीय इमारत, वसमत रोड, परभणी – ४३१ ४०२**
Web- www.vnmkv.ac.in reg_mau@rediffmail.com Telefax +91 2452 222955

क्र. २०२१/सुप-१८-१९/२३दीस/रो.पु/विद्या-३ दिनांक : ०५ आक्टोबर २०२१

# सूचनापत्र

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात सन २०१७-१८ व २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा २३ वा दीक्षांत समारंभ एप्रिल-२०२० च्या पहिल्या आठवडयात आयोजीत करण्याचे प्रस्तावित होते. त्या अनुषंगाने सन २०१८-१९ या वर्षाचे व्याज विवरणपत्र दिनांक ३१.०३.२०२० नंतर प्राप्त होणार असल्यामळे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील रोख पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील व्याज विवरणपत्रा नुसार पुरस्कार रक्कम देण्याबाबत मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमात ज्यांनी विहित कालावधीमध्ये एकदाही अनुतीर्ण न होता अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे अशा रोख पारितोषिक मिळण्यास नियमानुसार पात्र ठरत असलेल्या विद्यार्थ्यांचे सुचनापत्र क्र. एएक्ससी-२३/डी-३(एच) दिनांक १६.०३.२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

तथापी कोविड-१९ साथरोगाच्या प्रार्दुभावामुळे २३ वा दीक्षांत समारंभ नियोजीत वेळेत होवू शकला नाही. या दरम्यान सन २०१८-१९ या वर्षासाठीचे व्याज विवरण या कार्यालयास प्राप्त झाल्याने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध पदव्यूत्तर व पदवी अभ्यासक्रम विहित कालावधीमध्ये व एकदाही अनुत्तीर्ण न होता पूर्ण केल्यामुळे **रोख पारितोषिक** मिळण्यास नियमानुसार पात्र ठरत असलेल्या विद्यार्थ्यांचे सुधारीत सुचनापत्र प्रसिध्द करण्यात येत आहे.

या सुचनपत्रात दिनांक १६.०३.२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या सुचनापत्रातील अनुक्रमांक २ चा नॅशनल सिंपोझियम ऑन हेट्रॉसिस एक्सप्लॉयटेशन – १९८७ या नावे देण्यात येणारा रोख पुरस्कार संयोजकांच्या विनंती वरुन २०१ व्या कार्यकारी परिषदेतील ठराव क्र.का-२०/२५.०२.२०२१ अन्वये सुवर्ण पदक पारितोषिकात रुपांतर करण्यात आलेला असल्याने तो रोख पुरस्कार या सुधारीत सुचनापत्रातुन वगळण्यात आला आहे. इतर पारितोषिकांच्या केवळ रक्कमा सन २०१८-१९ च्या व्याजविवरण पत्रानुसार बदल झाला आहे. या शिवाय कोणताही बदल नाही.

| अ.क्र. | पारितोषिकाचे नांव / अभ्यासक्रमाचेनांव | विजेत्याचे नाव | पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|---|
| अ) | **पदव्युत्तर (कृषि)** | | |
| १ | **कै. श्री. गोपाल किशन काळे**- एम.एससी (कृषि) "किटकशास्त्र" या विषयात गुणानुक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास रोख पुरस्कार. | **वीनू व्हि** | रु. ५५८०/- (व्याजाच्या रकमेएवढे) |
| २ | **कै. डॉ. घनशाम उरकुडा मालेवार** - "एम.एससी.(कृषि) - मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र"या विषयात गुणानूक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास रोख पुरस्कार. | **कल्पना यादव** | रु.५५८० /- (व्याजाच्या रकमे एवढे) |
| ३ | **कै. स्वातंत्र्य सैनिक श्री रंभाजी टेमाजी जायभाये** - "एम.एससी.(कृषि) – कृषि हवामानशास्त्र" या विषयात गुणानूक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास रोख पुरस्कार. | **देशमुख सुजित सतिश** | रु. ५५८०/- (व्याजाच्या रकमेएवढे) |
| ४ | **कै. अशुतोष जिवनराव कुर्तडीकर** एम.एससी (कृषि) "किटकशास्त्र" या विषयात गुणानुक्रमे सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास रोख पुरस्कार. | **वीनू व्हि** | रु. ५५८०/- (व्याजाच्या रकमेएवढे) |
| ५ | **मा. माजी राज्यमंत्री प्रो. फौजिया तहसिन खान** - एम.एस्सी. (गृहविज्ञान) - मानव विकास व कौटुंबिक अभ्यास या विषयात गुणानूक्रमे प्रथम क्रमांकावर उत्तीर्ण झाल्याबद्दल | **स्वामी प्रियंका बलप्पा** | रु. ५५८०/- (व्याजाच्या रकमेएवढे) |

वरील रोख पारितोषिके आगामी २३ व्या दीक्षांत समारंभात विजेत्यांना प्रदान करण्यांत येतील.

मा. कुलगुरु, यांच्या मान्यतेने.

०७/१०/२१

(धिरजकुमार रा. कदम)
कुलसचिव

प्रतिलिपीः

१ संचालक शिक्षण व अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण / विद्यार्थी कल्याण अधिकारी, वनामकृवि, परभणी.

२ सहयोगी अधिष्ठाता (पदव्युत्तर), वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात करण्यांत येते की,उपरोक्त सूचनापत्र सर्व स्नातकांच्या निदर्शनास आणावे व सूचना पत्राबद्दल स्नातकांचे कांही आक्षेप असल्यास (४) दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास पूढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत.

३ सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, सर्व शासकीय महाविद्यालये अंतर्गत वनामकृवि, परभणी, यांना देवून कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनापत्र महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावून सर्व स्नातकांच्या निदर्शनास आणावे व **सूचना पत्राबद्दल स्नातकांचे कांही आक्षेप असल्यास (४) दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास पूढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत.तसेच आपल्या महाविद्यालयाशी संबंधीत पारितोषिक विजेत्या स्नातकांना २३ व्या दीक्षांत समारंभात/समारंभानंतर पारितोषिक स्विकारण्यासाठीस्वखर्चाने उपस्थित रहाण्यासाठी आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे व त्याची एक प्रत विद्यापीठास पाठवावी.**

४ नियंत्रक, वनामकृवि, परभणी

प्रतः

१ मा. कुलगुरु महोदय, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

२ या कार्यालयाची विद्या-८ आणि विद्या-११ शाखा विद्या विभाग, कुलसचिव कार्यलय, वनामकृवि, परभणी यांना पूढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३ प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील सुचनापत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

सूचना फलक, प्रशासकीय इमारत / ग्रंथालय, वनामकृवि, परभणी.